# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः10.07.2024** **वारःबुधवार**

---

1. 2030 पर्यंत भारत आणि रशियातील व्यापाराचं उद्दीष्ट शंभर अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचा निर्धार
2. रशियाच्या सर्वोच्च नागरी पुरस्कारानं पंतप्रधान नरेंद्र मोदी सन्मानित
3. पंतप्रधान मोदी दोन दिवसांच्या ऑस्ट्रिया दौऱ्यासाठी काल व्हिएन्ना इथं पोहोचले
4. उत्तरप्रदेशमध्ये आज बस आणि कंटेनर यांच्या अपघातात 18 जण ठार तर 30 हून अधिक जखमी आणि
5. जसप्रीत बुमराह आणि स्मृती मन्धाना आयसीसीचे जून महिन्यातील सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू

**भारत-रशिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रशिया दौऱ्यादरम्यान काल भारत आणि रशियानं 2030 पर्यंत आपसातील व्यापाराचं उद्दीष्ट शंभर अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचं ठरवलं आहे. पर्यावरण आणि हवामान बदल, ध्रुवीय संशोधन, गुंतवणूक, व्यापार, आणि औषध निर्माण तसंच यासह विविध क्षेत्रातील सहकार्यासाठी नऊ सामंजस्य करारांवर यावेळी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. याशिवाय प्रसार भारती आणि टीव्ही नोवोस्ती यांच्यातही प्रसारण क्षेत्रातल्या सहकार्याबाबतचा सामंजस्य करार करण्यात आला. अशी माहिती भारताचे परराष्ट्र सचिव विनय मोहन क्वात्रा यांनी मॉस्को इथं प्रसारमाध्यमांना सांगताना दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लामिदिमिर पुतिन यांच्या भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील परस्पर सहकार्य, आर्थिक गुंतवणूक, व्यापार, ऊर्जा, विज्ञान तंत्रज्ञान सहकार्य,तसंच संरक्षण आणि सुरक्षा आदी मुदडीनवर मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियन सैन्यात दिशाभूल होऊन भरती करण्यात आलेल्या भारतीय नागरिकांना लवकर सोडण्याचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर या नागरिकांना सोडण्याचं आश्वासन रशियाकडून मिळल्याचं परराष्ट्र सचिव क्वात्रा यांनी सांगितलं. याशिवाय प्रस्तावित ईस्टर्न कॉरिडॉर, खत पुरवठा आणि भारत-युरेशियन इकॉनॉमिक युनियन व्यापार आणि वस्तू करार आदी बाबींवरही सकारात्मक चर्चा झाली.

**पुतिन-आभार**

भारत-रशिया यांच्यातील संबंध येत्या काही वर्षांत अधिक दृढ होतील, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या भेटीदरम्यान त्यांनी काल सांगितलं की, गेल्या दहा वर्षांत 17 वेळा भेटी झाल्या असून गेल्या 25 वर्षांत 22 द्विपक्षीय बैठका झाल्या आहेत. यावरून दोन्ही देशांमधील मैत्रीपूर्ण संबंध लक्षात येतात. जगासमोर इंधंन पुरवठ्याचं आव्हान असताना रशियाच्या पाठिंब्यामुळे सर्वसामान्यांच्या पेट्रोल आणि डिझेलच्या गरजा पूर्ण करण्यासाठी भारताला मदत झाल्याचं मोदी यांनी सांगितलं. तर युक्रेनमधील संघर्षावर तोडगा काढण्यासाठी भारतानं प्रयत्न केल्याबद्दल पुतिन यांनी पंतप्रधान मोदींचे आभार मानले.

**पंतप्रधान-पुरस्कार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ऑर्डर ऑफ सेंट अँड्रयू द अपॉस्टल या रशियाच्या सर्वोच्च नागरी पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या हस्ते काल हा सन्मान प्रदान करण्यात आला. दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी आणि मैत्रीपूर्ण संबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी दिलेल्या विशेष योगदानाबद्दल हा

पुरस्कार देण्यात आला आहे. रशियाचे पहिले प्रेषित आणि संत सेंट अँड्र्यू यांच्या सन्मानार्थ झार पीटर द ग्रेट यांनी 1698 मध्ये या सन्मानाची स्थापना केली होती.

**पंतप्रधान-ऑस्ट्रीया**

रशियाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑस्ट्रियातल्या व्हिएन्ना इथं काल पोहोचले. गेल्या 41 वर्षांतील भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच ऑस्ट्रिया दौरा आहे. या दोन दिवसांच्या दौऱ्यात पंतप्रधान मोदी ऑस्ट्रियाचे अध्यक्ष अलेक्झांडर वान डेर बेलन आणि ऑस्ट्रियाचे चान्सलर कॉर्ल नेहमर यांच्याशी विविध मुद्यांवर चर्चा करणार आहेत. याशिवाय ऑस्ट्रियातील उद्योजक आणि भारतीय समुदायाशी पंतप्रधान मोदी संवाद साधणार आहेत.

**सौम्या स्वामीनाथन**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मुख्य सल्लागार म्हणून प्राध्यापिका डॉ. सौम्या स्वामीनाथन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाची उद्दिष्टे गाठण्यासाठी धोरणात्मक दिशानिर्देश तसंच संशोधन सुधारणा आणि मूल्यांकन आदी बाबींवर त्या मार्गदर्शन करतील असं आरोग्य मंत्रालयाच्या निवेदनात सांगितलं आहे. सौम्या स्वामीनाथन यांनी याआधी जागतिक आरोग्य संघटनेचे माजी मुख्य शास्त्रज्ञ तसंच भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या महासंचालक म्हणूनही काम केलं आहे.

**अपघात**

उत्तरप्रदेशमध्ये उन्नाव इथं दुमजली बस आणि दुधाचा कंटेनर यांच्यात धडक होऊन झालेल्या अपघातात 18 जण ठार झाले असून 30 हून अधिक जखमी झाले आहेत. बिहारमधल्या सीतामढीहून दिल्लीच्या दिशेनं बस जात असताना लखनौ-आग्रा द्रुतगती महामार्गावर आज सकाळी हा अपघात झाला. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बचाव कार्य वेगानं करण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.

**टपाल-विभाग**

दळणवळण मंत्रालयाअंतर्गत टपाल विभाग देशभरांत पुढील 100 दिवस 5 हजार डाक चौपालचं आयोजन करणार आहे. केंद्रिय मंत्री जोतीरादित्य शिंदे यांनी या 100 दिवसांच्या उपक्रमाबाबत करण्यात आलेल्या नियोजनाचा काल आढावा घेतला. टपाल खात्याकडून दिल्या जाणाऱ्या सुविधा आणि कार्यक्षमता वाढवण्याच्या उद्देशानं काय उपाययोजना करता येतील याबाबत काल झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील सामान्य नागरिक आणि प्रशासन यांच्यातील कामासंदर्भातील सुलभता सुनिश्चित करण्यासाठी डाक चौपाल महत्वाची भूमिका बजावतील अशी माहिती मंत्रालयानं दिली आहे. ग्रामीण निर्यातीला चालना देण्यासाठी 100 दिवसांत 3 हजार निर्यातदार डाकघर निर्यात केंद्र या संकेतस्थळावर आणण्याचं उद्दिष्ट्य ठेवण्यात आलं आहे. डाक चौपाल उपक्रमांतर्गत आवश्यक असलेला दस्तऐवजासाठी मदत, बाजारसंदर्भातील माहिती, बार-कोडेड लेबल आणि सीमेवर लागणारा परवाना पेपरविरहित उपलब्ध करुन देणं यासह इतर आवश्यक त्या सेवा पुरवल्या जातील. याबरोबरच सार्वजनिक आणि खासगी वितरण सेवा सुलभ करण्याच्या उद्देशानं टपाल विभाग देशाअंतर्गत प्रमाणित, जीओ कोडेड पत्ता प्रणाली विकसीत केली जाणार आहे.

**कोळसा मंत्रालय-राख**

औष्णिक ऊर्जा प्रकल्पांमधून तयार होणाऱ्या फ्लाय ॲश अर्थात राखेची योग्य विल्हेवाट आणि पुनर्निर्मिती करण्यासाठी योग्य दिशेनं पावलं टाकण्यात येत आहे, असं कोळसा मंत्रालयानं म्हटलं आहे. यासाठी 13 औष्णिक ऊर्जा प्रकल्पांना 19 खाणींच्या मोकळ्या जागा वाटप करण्यात आल्या आहेत. ही प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी लवकरच केंद्रीय खाण नियोजन आणि संरचना संस्थेच्या मदतीनं एक पोर्टल तयार करण्यात येईल,असंही कोळसा मंत्रालयानं म्हटलं आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयानं सांगितल्यानुसार, फ्लाय ॲश या शब्दामध्ये इलेक्ट्रोस्टॅटिक प्रीसिपिटेटर राख, ड्राय फ्लाय ॲश, तळाची राख, तलावातील राख आणि माऊंड ॲश यासारख्या तयार होणाऱ्या सर्व राखांचा समावेश होतो.

**खलिस्तान-समर्थक**

केंद्र सरकारनं खलिस्तानी समर्थक असेलल्या 'सिख्स फॉर जस्टिस' या संघटनेवरची बंदी आणखी पाच वर्षांनी वाढवली आहे. बेकायदेशीर कारवाया प्रतिबंध कायद्यांतर्गत काल ही कारवाई करण्यात आली. भारतानं दहशतवादी म्हणून घोषित केलेला गुरपतवंत सिंग पन्नून अमेरिकेतून चालवत असलेली ही संघटना देशविरोधी कारवायांमध्ये सक्रिय असल्याचं आढळून आल्यानं केंद्र सरकारनं 2019 मध्ये या संघटनेवर बंदी घातली होती. तर राष्ट्रीय तपास संस्थेनंही पन्नूनवर याधीच अनेक खटले दाखल केले आहेत.

**सर्वोत्कृष्ठ खेळाडू**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं भारतीय गोलंदाज जसप्रीत बुमराह याला जून 2024 साठीचा सर्वोत्कृष्ठ खेळाडू हा सन्मान काल जाहीर केला. नुकत्याच झालेल्या T20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत बुमराहच्या गोलंदाजीमुळे भारतीय संघाला विश्वचषकाला गवसणी घालता आली. या स्पर्धेत 8 सामन्यात बुमराहनं 15 गडी बाद केले. त्याला स्पर्धावीर हा किताब देऊनही सन्मानित करण्यात आलं होतं. तसंच भारतीय महिला संघातील स्मृती मंधाना हीलाही जून महिन्यासाठीची सर्वोत्कृष्ठ खेळाडू म्हणून घोषित करण्यात आलं आहे. तिनं इंग्लंडच्या माईया बाऊशीअर आणि श्रीलंकेच्या विशमी गुणरत्ने यांना मागे टाकत हा सन्मान मिळवला. दक्षिण अफ्रिकेविरुध्दच्या सामन्यात स्मृतीनं केलेल्या कामगिरीची दखल घेत तिचा गौरव करण्यात येत आहे.

**विम्बल्डन**

इंग्लंडमध्ये सुरु असलेल्या विम्बलडन टेनिस स्पर्धेत डॅनिएल मेदवेदेव यानं जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या जानिक सिन्नेर याचा 6-7, 6-4, 7-6, 2-6, 6-3 अशा सेटमध्ये पराभव केला. या विजयामुळे जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानावर असलेल्या मोदवेदेवनं स्पर्धेतील उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. येत्या शुक्रवारी जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असलेल्या कार्लोस अल्कराज बरोबर त्याचा सामना होणार आहे. महिला एकेरीत क्रोएशियाच्या डोना वेकीक हिनं न्युझिलंडच्या लुलू सन हिचा 5-7, 6-4, 6-1 असा पराभव केला. तिचा उपांत्य फेरीचा सामना सातव्या क्रमांकावर असलेल्या इटलीच्या जस्मिन पाओलीनी हिच्याबरोबर उद्या होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.